# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:22.04.2025** **वार:मंगळवार**

---

**ठळक बातम्या**

- पंतप्रधान नरेंद्र मोदी आजपासून सौदी अरेबियाच्या दौऱ्यावर
- अमेरिकेचे उपराष्ट्राध्यक्ष जे. डी. व्हान्स आणि पंतप्रधान मोदी यांच्यात द्वीपक्षीय मुद्दयावर चर्चा
- ट्रम्प प्रशासनाकडून प्रस्तावित निधी कपात रोखण्यासाठी हावर्ड विद्यापीठाने प्रशासनाविरोधात खटला
- बुद्धिबळ ग्रँड पिक्समध्ये कोनेरू हम्पीची विजयी आघाडी

आणि

- आयपीएलमध्ये गुजरात टायटन्स संघाची कोलकाता नाईट रायडर्सवर मात

**पंतप्रधान सौदी भेट**

सौदीचे युवराज आणि पंतप्रधान मोहम्मद बिन सलमान यांच्या निमंत्रणानुसार पंतप्रधान नरेंद्र मोदी आजपासून सौदी अरेबियाच्या दोन दिवसांच्या अधिकृत दौऱ्यावर जात आहेत. हा त्यांचा तिसरा सौदी अरेबिया दौरा आहे. यातून भारत आणि सौदी अरेबियामधील वाढती धोरणात्मक भागीदारी अधोरेखित होणार असून यामुळे व्यापार, ऊर्जा, संरक्षण आणि परस्पर संबंधांमध्ये मजबूत सहकार्य वाढीस लागणार आहे. सौदी अरेबिया आपल्या महत्त्वाकांक्षी व्हिजन २०३० या मोहिमेला गती देत असतांना मोदी यांचा हा दौरा विशेष महत्त्वाचा मानला जात आहे.

**उपराष्ट्राध्यक्ष व्हान्स**

अमेरिकेचे उपराष्ट्राध्यक्ष जे. डी. व्हान्स यानी काल नवी दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. उभय नेत्यांनी द्वीपक्षीय सहकार्याच्या विविध क्षेत्रातल्या प्रगतीचा आढावा घेतला. ऊर्जा, संरक्षण, धोरणात्मक तंत्रज्ञान आणि इतर क्षेत्रांमध्ये सहकार्य वाढवण्याच्या दिशेने सुरू असलेल्या प्रयत्नांचीही त्यांनी नोंद घेतली. तसंच परस्पर हिताच्या विविध प्रादेशिक आणि जागतिक मुद्द्यांवरही विचारांची देवाणघेवाण केली. पंतप्रधानांनी व्हान्स यांच्या सन्मानार्थ मेजवानीचंही आयोजन केलं होतं. जेडी व्हान्स सहकुटुंब आज जयपूरच्या ऐतिहासिक आमेर किल्ल्याला भेट देतील. त्यानंतर दुपारी व्हान्स भारत अमेरिका व्यापार संबंधांचे भविष्य या विषयावरील उद्योग परिषदेला संबोधित करतील.

**अर्थमंत्री निर्मला**

अमेरिकेच्या नव्या प्रशासनाशी भारत सक्रीय संवाद साधत असून पुढील पाच ते सहा महिन्यात उभय देशांदरम्यान द्वीपक्षीय व्यापार कराराचा पहिला टप्पा सकारात्मक दृष्टीने पूर्ण करण्याची आशा अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी व्यक्त केली आहे. अर्थमंत्री निर्मला सीतारामन सध्या पाच दिवसांच्या अमेरिकेच्या दौऱ्यावर असून, त्या विविध अधिकाऱ्यांच्या भेटी घेणार आहेत. या वर्षाच्या सुरुवातीलाच अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी द्विपक्षीय व्यापार करारासंदर्भात चर्चा सुरू करण्यास सहमती दर्शविली होती. मिशन 500 अंतर्गत उभय देशांतील व्यापार दुपटीपेक्षा जास्त

करून तो 500 अब्ज डॉलर्स पर्यंत पोहोचवण्याचे या कराराचे उद्दीष्ट आहे.  या दौऱ्यात सीतारामान अमेरिकेचे वित्त मंत्री स्कॉट बेसेंट यांची भेट घेणार आहेत. तसंच स्टॅनफोर्ड विद्यापीठात त्या बीजभाषण देणार आहेत आणि सॅन फ्रान्सिस्कोमधील मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांशी गुंतवणूक आणि तांत्रिक प्रगतीवर चर्चा करणार आहेत. तसंच अमेरिकेची राजधानी वॉशिंग्टन डीसीमध्ये, सीतारमन जागतिक नाणेनिधी आणि जागतिक बँकेच्या बैठकांना तसंच जी 20 देशांच्या अर्थमंत्री आणि केंद्रीय बँक गव्हर्नरच्या बैठकींना उपस्थित राहतील. त्यानंतर 26 ते 30 एप्रिल दरम्यान पेरूला भेट देणार आहेत.

**वसुंधरा  दिवस**

आज वसुंधरा दिन आहे. पर्यावरण संरक्षणाबाबत जनजागृतीच्या उद्देशाने हा दिवस जगभरात साजरा केला जातो. पर्यावरणीय समस्यांबद्दल जागरुकता वाढवून आपल्या पृथ्वीचे रक्षण करण्यासाठी कृतीशील राहाण्यासाठी प्रेरणा देणे तसंच स्वच्छता आणि वृक्षारोपण यासारख्या सामुदायिक प्रयत्नांना चालना देणे हा यामागचा उद्देश आहे. "आपली वसुंधरा आपली ऊर्जा" ही या वर्षीच्या वसुंधरा दिनाची संकल्पना आहे. या निमित्तानं देशभरात अनेक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

**पृथ्वी वाचवा शहा**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आज दिल्लीत होणाऱ्या हवामान बदलांसंदर्भातल्या सेव्ह अर्थ परिषदेचे उद्घाटन करणार आहे. हवामान बदलांना तोंड देणे आणि आर्थिक विकासाला चालना देणे या दृष्टीने बांबूची क्षमतेची चाचपणी करण्यासाठी प्रयत्न केले जातील. केंद्रीय रस्ते वाहातूक आणि महामार्ग मंत्री नीतिन गडकरी आणि केंद्रीय पर्यावरण मंत्री भुपेंद्र यादव यातील विविध सत्रांमध्ये संबोधित करणार आहेत. यावेळी हरित नवोपक्रमात परिवर्तनकारी बदल घडवून आणणाऱ्या 15 अग्रदूतांना इंडिया सस्टेनेबिलिटी पुरस्कार 2025 ने गौरवण्यात येणार आहे.

**एक निवडणूक**

'एक राष्ट्र, एक निवडणूक' या विषयावर आज संयुक्त संसदीय समितीची बैठक होणार आहे. बैठकीच्या पहिल्या सत्रात, सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश न्यायमूर्ती हेमंत गुप्ता यांच्याशी संवाद साधला जाईल. त्यानंतर जम्मू आणि काश्मीर उच्च न्यायालयाचे माजी मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती एसएन झा यांच्याशी संवाद साधला जाईल. त्या पुढच्या सत्रात सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश आणि भारताच्या 21 व्या कायदा आयोगाचे अध्यक्ष डॉ. न्यायमूर्ती बीएस चौहान यांचा समावेश आहे. समारोपाच्या सत्रात राज्यसभा सदस्य आणि ज्येष्ठ वकील डॉ. अभिषेक मनु सिंघवी यांच्याशी बातचीत होईल.

**भारताचे मुख्य न्यायाधीश - हांगझोउ**

भारताचे मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती संजीव खन्ना 20 व्या एससीओ अर्थात शांघाय सहकार्य संघटनेच्या मुख्य न्यायाधीशांच्या बैठकीला उपस्थित राहण्यासाठी काल हांगझोउ इथे पोहोचले. चीनच्या सर्वोच्च लोक न्यायालयाचे कार्यकारी उपमुख्य न्यायाधीश डेंग झियमिंग आणि शांघायमधील भारताचे वाणिज्य दूतावास प्रतीक माथूर यांनी न्यायमूर्ती खन्ना यांचं स्वागत केलं.

**मुंबई उच्च न्यायालय**

देशभरातल्या विमानतळांवर ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग आणि विशेष व्यक्तींसाठी दिल्या जाणाऱ्या अपुऱ्या सुविधांविषयी मुंबई उच्च न्यायालयानं चिंता व्यक्त केली आहे. विमानतळांवर व्हीलचेअरच्या कमतरतेमुळे या व्यक्तींना त्रास होऊ नये यासाठी नागरी विमान वाहातूक संचालनालय, विमानतल संचालक आणि विमान कंपन्यांना प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याचे निर्देश न्यायालयानं दिले आहेत. या संदर्भात दाखल दोन याचिकांवर सुनावणीदरम्यान न्यायालयानं हे निर्देश दिले.

**हावर्ड ट्रम्प**

अमेरिकेतील ट्रम्प प्रशासनाने प्रस्तावित केलेली अब्जावधी डॉलर्सचा निधी कपात रोखण्यासाठी हावर्ड विद्यापीठाने प्रशासनाविरोधात खटला दाखल केला आहे. ट्रम्प प्रशासनाने, संस्थेच्या विविधतेच्या उपक्रमांना आळा घालण्यासाठी आणि ख्रिस्तीविरोधी भावनांविरोधात लढण्यासाठी पाठवलेल्या मागण्या संस्थेनं नाकारल्यानं हा वाद वाढला आहे. हार्वर्ड विद्यापीठाचे अध्यक्ष ॲलन एम. गार्बर यांनी विद्यापीठ समुदायाला लिहिलेल्या पत्रामध्ये सरकारच्या या धोरणाचे गंभीर आणि दीर्घकालीन परिणाम होतील असं नमूद केलं आहे. ट्रम्प प्रशासनाने निधी रोखल्याने बालकर्करोग, अल्झायमर आणि पार्किन्सन या आजारांवरील अभ्यासांसह गंभीर संशोधनावर परिणाम झाल्याचंही पत्रात नमूद केलं आहे. या खटल्यासंदर्भात व्हाईट हाऊसने अद्याप कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही.

**रशिया इराण**

रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी इराणसोबत व्यापक धोरणात्मक भागीदारीला मान्यता देणाऱ्या कायद्यावर स्वाक्षरी केली आहे. 17 जानेवारी रोजी रशियामध्ये व्लादिमीर पुतिन आणि इराणी अध्यक्ष मसूद पेझेश्कियान यांच्यात झालेल्या शिखर परिषदेत सुरुवातीला या करारावर स्वाक्षरी करण्यात आली होती, ज्यामध्ये उभय नेत्यांनी व्यापार, संरक्षण, ऊर्जा आणि प्रादेशिक पायाभूत सुविधा प्रकल्पांमध्ये सहकार्य करण्याचं मान्य केलं होतं.

**बुद्धिबळ पुणे**

पुण्यात झालेल्या बुद्धिबळ ग्रँड पिक्समध्ये, भारतीय ग्रँडमास्टर कोनेरू हम्पीने चीनच्या झू जिनरवर विजय मिळवत आघाडी घेतली. दिव्या देशमुखनं मंगोलियाच्या बटखुयाग मुगुंटलवर विजय मिळवला. तिला स्पर्धेत आघाडी घेण्याची संधी आहे. आज स्पर्धेची आठवी फेरी दुपारी सुरु होईल.

**नेमबाजी**

पेरूमध्ये झालेल्या नेमबाजी विश्वकरंडक स्पर्धेत भारतीय खेळाडू सिमरनप्रीत कौर हिनं महिलांच्या 25 मीटर पिस्तुल स्पर्धेत रौप्यपदकाला गवसणी घातली. तिचे हे पहिलेच आंतरराष्ट्रीय पदक आहे. दोन सुवर्ण आणि एका कांस्यपदकासह भारताचे हे स्पर्धेतील चौथे रौप्यपदक आहे.

**आयपीएल**

आयपीएल क्रिकेट मालिकेत काल शुभमन गिलच्या नेतृत्वाखाली गुजरात टायटन्स संघानं कोलकाता नाईट रायडर्सचा 39 धावांनी पराभव केला. गुजरातचा हा सहावा विजय आहे. कोलकाताच्या ईडन गार्डन्स मैदानावर झालेल्या सामन्यात गुजरातनं दिलेल्या 199 धावांचं लक्ष्य पार करताना कोलकाताचा संघ 159 धावाच करू शकला. आज लखनौ सुपर जायंटस् आणि दिल्ली कॅपिटल्स दरम्यान लखनौ इथं संध्याकाळी सामना होणार आहे.

**हवामान**

येत्या दोन दिवसांत देशातल्या बहुतांश भागात उष्णतेची लाट येण्याची शक्यता भारतीय हवामान खात्यानं वर्तवली आहे. राजस्थान, मध्यप्रदेश, हरियाणा, उत्तर प्रदेश, विदर्भ आणि छत्तीसगड मध्ये ही लाट येण्याचा अंदाज आहे. तर मराठवाडा, केरळ, तामिळनाडू, पुदुचेरी, कराईकल, रायलसीमा आणि आंध्र प्रदेशचा किनारी भाग या ठिकाणी हवामान उष्ण आणि दमट

राहाण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. तर देशाच्या ईशान्येकडील भागात येत्या तीन ते चार दिवसांत मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. तसंच जम्मू-काश्मीर लडाख-गिलगिट-बाल्टिस्तान-मुझफ्फराबाद येथे वादळ, विजांचा कडकडाट आणि सोसाट्याच्या वाऱ्यांसह हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे.

**या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार**